महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ अंतर्गत लोकसेवा आवश्यक कागदपत्रे, फी, नियत कालमर्यादा,पदनिर्देशित अधिकारी,प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी अधिसुचित करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**

**मृद व जलसंधारण विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४९/जल-१७**

मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुबंई-३२

दिनांकः-३०/१०/२०१८

**संदर्भः**- सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.५

**प्रस्तावनाः-**

सार्वजनिक जीवनातील आर्थिक व सामाजिक क्षेत्रांच्या शाश्वत विकासाठी सुप्रशासन अत्यावश्यक आहे. प्रशासनातील पारदर्शकता,उत्तरदायित्व व प्रतिक्रियाशीलता हे सुप्रशासनाचे तीन अत्यावश्यक घटक आहेत. जनता व प्रशासन या मधील संबंध सुधारण्यासाठी व ते बळकट करण्यासाठी , महाराष्ट्र शासनास , प्रशासनामध्ये उत्तरदायित्व जबाबदारी व पारदर्शकता आणण्यासाठी कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याची तरतुद करण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश -२०१५ दि.२८/०४/२०१५ रोजी राज्यात लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम-३ मध्ये नमूद तरतूद विचारात घेता विभागाव्दारे पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा घोषित करून त्याप्रमाणे संबंधित सेवा पूरविणे आवश्यक आहे.त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय** :-

(अ.) या शासन निर्णयाच्या सहपत्रामध्ये नमूद केलेल्या एकूण ८ सेवा राज्यातील सर्व प्रदेश कार्यालयानी कलम ३ अनूसार अधिसूचित कराव्यात.

(ब) मृद व जलसंधारण विभागाने पूरवावयाच्या लोकसेवांची सुची, नियत कालमर्यादा, विहित नमुना व फी, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी यांचा तपशिल कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रर्दशित करण्यात यावा.

(क) शासन निर्णयासोबतच्या सहपत्रामध्ये नमूद केलेल्या ८ सेवा, आवश्यक कागदपत्रे व नियत कालावधी यामध्ये संबंधित प्रदेश कार्यालयांना बदल करता येणार नाही.

(ड) संदर्भ अध्यादेशामधील कलम ३ नूसार सेवा अधिसूचित करणे व त्याची अंमलबजावणी करण्याबाबतची कार्यवाही दि. १० नोव्हेंबर, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याची जबाबदारी मुख्य अभियंता लघुसिचंन (जलसंधारण)पुणे यांचेवर राहील.

(इ) संदर्भ अध्यादेशामधील तरतूदीनूसार अधिसूचित केलेल्या सेवा पूरविण्याची जबाबदारी सोबतच्या सहपत्रामध्ये निर्देशित केलेल्या अधि-यांवर राहील.

(ई) प्रस्तुत सेवा संबधीचा सर्व प्रादेशिक कार्यालयाचा एकत्रीत अहवाल आयुक्त (मृद व जलसंधारण) औरंगाबाद यांनी विहीत विवरणपत्रात शासनास दर महिन्याच्या १ तारखेस न चुकता सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१८१०३१११२९३६०१२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( वि.म. बोरकर )**
कक्ष अधिकारी,

**प्रत:**

१. मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव
३. सर्व मा. मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मा.विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
५. सर्व सन्माननीय विधानसभा /विधानपरिषद व संसद सदस्य.
६. मा.राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यालय,मुबंई
७. मा.राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांचे कार्यालय,मुबंई
८. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक.
९. मा.लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय.
१०.अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
११.मुख्यमंत्री महोदय यांचे जनसंपर्क अधिकारी.
१२.आयुक्त,मृद व जलसंधारण आयुक्तालय,औरंगाबाद
१३.मुख्य अभियंता,लघुसिचंन(जलसंधारण)पुणे
१४.अधिक्षक अभियंता तथा प्रादेशिक जलसंधारण अधिकारी,मृद व जलसंधारण विभाग,ठाणे/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/अमरावती/नागपुर
१५.मृद व जलसंधारण विभागातील सर्व सहसचिव /उपसचिव /अवर सचिव./कक्ष अधिकारी
१६.कार्यासन जल-१७ निवड नस्ती.

**शासन निर्णय मृद व जलसंधारण विभाग ,क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४९/जल-१७**

**दिनांक ३०/१०/२०१८**

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५**

(कलम ३ अन्वये प्रादेशिक कार्यालयांनी जाहिर करावयाचा लोकसेवा तपशिल)

मृद व जलसंधारण विभागांतर्गत नागरीकांना द्यावयाच्या ८ सेवा

| अ.क्र | सेवा क्रमांक | विषय | सेवा मागणीसाठी आवश्यक कागदपत्रे | सेवा उपलब्धते साठी आकारण्यात येणारे शुल्क | सेवा पुरविण्याचा कालावधी | पद निर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | व्दीतीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | सेवा क्र.१ | पाणीवापर संस्थेस देय पाणी हक्क मंजूरी देणे | विहीत नमुन्यातील अर्ज | निःशुल्क | १५ दिवस (हंगाम सुरू झाल्यानंतर) | संबधित जलसंधारण अधिकारी | संबंधित उप विभागीय जलसंधारण अधिकारी | संबंधित जिल्हा जलसंधारण अधिकारी |
| २ | सेवा क्र.२ | पाणीवापर संस्थेस पाणीपट्टी थकबाकी दाखला देणे | विहीत नमुन्यातील अर्ज | निःशुल्क | १५ दिवस | संबधित जलसंधारण अधिकारी | संबंधित उप विभागीय जलसंधारण अधिकारी | संबंधित जिल्हा जलसंधारण अधिकारी |
| ३ | सेवा क्र.३ | बिगर सिंचन पाणी पट्टी थकबाकी दाखला देणे | विहीत नमुन्यातील अर्ज | निःशुल्क | १५ दिवस | संबधित जलसंधारण अधिकारी | संबंधित उप विभागीय जलसंधारण अधिकारी | संबंधित जिल्हा जलसंधारण अधिकारी |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | सेवा क्र.४ | पाणी पट्टी देयक तक्रार निवारण करणे | विहीत नमुन्यातील अर्ज | निःशुल्क | १५ दिवस | संबधित जलसंधारण अधिकारी | संबंधित उप विभागीय जलसंधारण अधिकारी | संबंधित जिल्हा जलसंधारण अधिकारी |
| ५ | सेवा क्र.५ | लाभक्षेत्राचा दाखला देणे | विहीत नमुन्यातील अर्ज,७/१२ चा उतारा | निःशुल्क | १ महिना | संबधित जिल्हा जलसंधारण अधिकारी | संबधित प्रादेशिक जलसंधारण अधिकारी | अप्पर आयुक्त( जलसंधारण) |
| ६ | सेवा क्र.६ | ग्रामपंचायत,जिल्हा परिषद,नगर पालीका, नगर परिषद,नगर पंचायत,कटक मंडळे (Contonment Board) यांना घरगुती पाणी वापर परवाना देणे | विहीत नमुन्यातील अर्ज,योजनेचा नकाशा ,संरेखा, ७/१२ चा उतारा, प्रमाणीत जलसंधारण अधिकारीचा अश्वशक्ती याबाबतचा तांत्रिक अहवाल,सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा आराखडा व नकाशा (STP) सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारण्याचे हमीपत्र | निःशुल्क | ३ महिने | संबधित जिल्हा जलसंधारण अधिकारी | संबधित प्रादेशिक जलसंधारण अधिकारी | अप्पर आयुक्त (जलसंधारण) |
| ७ | सेवा क्र.७ | महानगरपालिका खाजगी विकासक, विशेष नगर विकास प्रकल्प यांना घरगुती/औदयोगिक पाणी वापर परवाना देणे | विहीत नमुन्यातील अर्ज.म.जि.प्रा.प्रमाणीत लोकसंख्या परिगणना व पाणीवापर, योजनेचा नकाशा ,संरेखा,७/१२ चा उतारा,प्रमाणीत जलसंधारण अधिकारीचा अश्वशक्ती याबाबतचा | निःशुल्क | ६ महिने | संबधित जिल्हा जलसंधारण अधिकारी | संबधित प्रादेशिक जलसंधारण अधिकारी | अप्पर आयुक्त (जलसंधारण) |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | तांत्रिक अहवाल,सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा आराखडा व नकाशा (STP) सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारण्याचे हमीपत्र.विशेष नगर विकास प्रकल्पासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र. | | | | | |
| ८ | सेवा क्र.८ | औदयोगिक प्रयोजनासाठी पाणी वापर परवाना देणे | विहीत नमुन्यातील अर्ज, संस्था नोंदणी प्रमाणपत्र, योजनेचा नकाशा, संरेखा,७/१२ चा उतारा, उद्योग सुरू करण्याचे प्रमाणपत्र, महाराष्ट्र प्रदुषण महामंडळाचे कन्सेन्ट टू एस्टाब्लिश/पर्यावरण प्रमाण पत्र ,हमीपत्र, प्रमाणीत जलसंधारण अधिकारीचा अश्वशक्ती याबाबतचा तांत्रिक अहवाल, सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा आराखडा व नकाशा (STP) सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारण्याचे हमीपत्र, स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र | निःशुल्क | ६ महिने | संबंधित जिल्हा जलसंधारण अधिकारी | संबंधित प्रादेशिक जलसंधारण अधिकारी | अप्पर आयुक्त (जलसंधारण) |